नि.फौ.ख.क्र.१४०००९२/२०१४.
सरकार वि. सत्यनरायण
**निशाणी क्र.१४ वर पुढे**

**<u>साक्षीदार क्रमांक ०३ मोरेश्वर नारायण भुरशारे यांचा शपथेवर उलट तपास आरोपी क्र.१ व २ चे वकिल श्री.ए.व्ही.गजभिये याचेमार्फत</u>**

**०१.** मी रामटेक येथे वनविभागाच्या कार्यालयात सन १९९२ पासून कार्यरत आहे. मी वनमजुर म्हणून काम करत होतो. सन २०१२ साली वाघे साहेब माझे वरिष्ठ होते. वनमजुर म्हणून माझी डयुटी कधी जंगलामध्ये व कधी कार्यालयात असते. वन अधिकारांनी मला दिवसा १२ वाजता बोलविले होते. मला हजर राहण्याकरीता काही लेखी सुचना दिल्या नव्हत्या. मी त्यादिवशी दिनांक २६.०९.२०१२ रोजी कार्यालयात दुपारी ३ वाजे पर्यंत होतो. त्यानंतर कार्यालयात या केसच्या संदर्भात ६ वाजे पर्यंत होतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनाम्यावर कार्यरत असतांना मी सह्या केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक. २६.०९.२०१२ रोजी वन अधिकारी काशीकर व नागरगोजे यांनी मौजा अजनी येथे जायचे आहे असे म्हणून पंचनामा कार्यवाही करीता बोलविले नव्हते व काशीकर साहेबांनी आरोपीचा शोध घ्यायचा आहे असे मला सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी परिसरात पाहणी देखील केली नाही व एक आरोपी लिल्हारे हा देखील मिळाला नव्हता.

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, काशीकर साहेबांनी माझ्या समक्ष मोकापंचनामा केला होता व त्यावर आरोपीची सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, त्याच दिवशी वनअधिकारी यांनी गावात दुसऱ्या आरोपीचा शोध घ्यायचा आहे असे म्हटले व दुसऱ्या आरोपीचा शोध घेतला. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, आरोपीच्या सांगण्यावरून शेताची पाहणी करून शेताच्या धुऱ्यावर एक सत्तुर, दोन सुरे, तीन विळे व एक खुरपणे असे जप्त केले व त्याबाबतचा पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, दुसऱ्या दिवशी २७ तारखेला परत अजनी गावात दुसऱ्या आरोपीचा शोध घेण्याकरीता अजनी गावात गेलो व त्याबाबतचा पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष वनअधिकारांनी कोणतेही पंचनामे केले नाही व मुद्देमाल जप्त केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून मी त्यांच्या हाताखाली काम करत असल्याने मी त्यांच्यासांगण्यावरून खोटया पंचनाम्यावर सहया केल्या आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठांच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपी क्र.३ ते ७ चे वकिल श्री.ए.जी कारेमोरे यांनी वरील उलटतपास आरोपी क्र.३ ते ७ यांचेकरीता ग्राहय धरण्याकरीता सांगीतले करीता सदर उलटतपास आरोपी क्र.३ ते ७ करीता ग्राहय धरण्यात येतो.</u>**

उलटतपास पुर्ण
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
सही/-

रामटेक
दिनांक - १६/१२/२०२४

**(श्रीमती. डी. एस.सैंदाणे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं.२, रामटेक